## प्रकरण पहिले

## देशभक्त डॉ.रत्नाप्पा कुंभार : जीवन वृत्तांत (१९०९ ते आज अखेर )

## प्रकरण पहिले

### देशभक्त डॉ. रत्नाप्पा कुंभार : जीवन वृत्तांत (१९०९ ते आज अखेर )

मानवी योनीत जन्मास येणे फार मोठी भाग्याची गोष्ट आहे. मानव एकदाच जन्मतो त्यामुळे त्याच्या आयुष्याला फार मोलाचे महत्व आहे. कोट्यावधी माणसे आजवर जन्माला आली व गेली. मात्र फारच थोडी गाजली. अशा कर्तृत्व संपन्न माणसांनी राष्ट्र, जग घडविण्याचे कार्य केले, आणि आपल्या अलौकिक कार्य कर्तृत्वाने ही माणसे ऐतिहासिकदृष्ट्या समाजाचे आदर्श ठरले . अशा या लोकांचा आदर्श कृतीत आणण्याचा समाज नेहमी प्रयत्न करीत असतो असा हा समाज कर्तव्यसंपन्न बनतो. कोल्हापूर जिल्ह्याचे श्रेष्ठ व ज्येष्ठ कॉंग्रेस नेते श्री. रत्नाप्पा कुंभार यांच्या बाबतीत ही विलक्षण प्रचिती येते.

भारत देशामध्ये ८० टक्के जनता ही शेतीवर अवलंबून आहे, त्यामुळे ८० टक्के भाग हा पूर्णपणे खेड्यांनीच व्यापला आहे. या ग्रामीण भागात बारा बलुतेदारांचा वर्ग निर्माण झाला. या बलुतेदार वर्गामध्ये कुंभार समाज मोडतो. या वर्गातिल लोकांना पोटाला पोटभर अन्न देखिल मिळत नसे. अशांना शिक्षण मिळणे तर दुरापास्तच होते. अशा प्रकारच्या कुंभार समाजात श्री. रत्नाप्पा भरमाप्पा कुंभार यांचा जन्म १५ सप्टेंबर १९०९ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातिल शिरोळ तालुक्यातिल निमशिरगांव या खेडेगावांत त्यांच्या शेतीतिल खोपीत झाला.[१] त्यावेळी प्लेगची साथ असल्याने त्यांचे आई-वडिल

गांव सोडून शेतात रहात होते. गरीब, सालस, माळकरी, सत्प्रवृत्त, धार्मिक प्रवृत्तीच्या अशा भरमाप्पा व बाळाई या दांपत्याच्या पोटी त्यांचा जन्म झाला. पण संबंध महाराष्ट्रभर त्यांना ` आण्णा ` या घरगुती नांवाने संबोधले जाते. त्यांच्या वयाच्या सातव्या वर्षी त्यांची आई निधन पावली, त्यामुळे ते मातृ-सुखाला कायमचे पारखे झाले.[२] त्यांचेवर दुसरा आघात त्यांच्या एकुलत्या एक बहिणीच्या निधनाने झाला. त्यांची ही बहिण तिच्या वयाच्या १९व्या वर्षी विवाहानंतर आण्णांना सोडून गेली. त्यामुळे आण्णांचा सांभाळ, शिक्षण, संस्कार त्यांच्या वडिलांनीच केला. आण्णांच्या सांभाळासाठी त्यांच्या वडिलांनी परंपरेनुसार पुर्नविवाह करण्याचे टाळले. अखेरपर्यन्त त्यांनी स्वत:च्या हातांनीच स्वयंपाक केला. घरची अत्यंत गरीबी असल्याने वडिलांनी कौलाचा व्यवसाय सुरु केला. त्यांची परिस्थिती बेताची असली तरी देखिल आण्णांच्या वडिलांनी गावासाठी खूप काम केले. त्यामुळे त्यांनागावात प्रतिष्ठा व मान होता. लोकोपयोगी कार्याच्या बाळकडूची दिक्षा आण्णांना त्यांच्या वडिलांच्याकडूनच प्राप्त झाली.

रत्नाप्पा कुंभारांनी आपल्या वडिलांच्या इच्छेला मान देऊन प्राथमिक शिक्षणाचा ` श्री गणेशा ` सुरु केला इ.स.१९१७ ते १९२४ पर्यन्त त्यांच्या जन्म गावी निमशिरगांव येथे प्राथमिक शिक्षण पुरे केले. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत प्रतिकुल असताना, मराठी सातवी पास झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते कोल्हापूरला आले. समाज सुधारक छत्रपती शाहु महाराजांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या विरशैव लिंगायत बोर्डिंग मध्ये त्यांनी प्रवेश घेतला. तेथूनच ते इ.स.१९२८ साली मुंबई विद्यापिठाची मॅट्रीक परीक्षा उत्तीर्ण झाले.[3] महाविद्यालयीन शिक्षणासाठी कोल्हापूरला जाऊन-येऊन शिक्षण घेणे हे आर्थिक दृष्टया कठिण असल्यामुळेच त्यांनी वसतिगृहात आश्रय घेऊन महाविद्यालयीन अभ्यासाला सुरुवात केली. कोल्हापूरमध्ये शिक्षण घेत असताना आण्णा रोज रेल्वेने हातकणंगलेस जात व तेथे घरातील एक म्हातारी निमशिरगांवहून पायी हातकणंगले स्टेशनवर जेवण घेऊन येत असे व तेथे आण्णा रेल्वे पुलाखाली बसून पोटभर जेवण करुन उरलेले अन्न

घेवून परत कोल्हापूरला येत असत. अशा खडतर व अवघड परिस्थितीशी टक्कर देत आण्णाचे शिक्षण चालू होते.

चिकणमाती तुडवून चाकावर थापून मडकी करण्याचा आपल्या पिढीजात धन्दा मुलाने करावा व दोन वेळचे भाजी - भाकरी मिळावी अशी कुटुंबियांची इच्छा होती. परंतु आण्णा मळलेल्या वाटेने जाणारे नव्हते तर नवी वाट तयार करणारे पाईक होते. आण्णाना घडवायाची होती, मडकी पण मातीची नव्हे तर चालती बोलती रक्तामासांची, त्यादृष्टीनेच हे व्यक्तिमत्व सर्वांगानी विकसित होऊ लागले. इच्छा तेथे मार्ग याप्रमाणे श्री रत्नाप्पा कुंभारांचे शिक्षण सुरू झाले. घरच्या गरिबीमुळे अनंत अडचणीतून त्यांना मार्ग काढावा लागला.

छ.शाहु महाराजांचे ( १८८४-१९२२ ) पुरोगामी धोरण ,छ.राजाराम (१९२२-४० ) महाराजांनी पुढे सुरू ठेवल्याने अनेक विद्यार्थ्यांना त्याचा फायदा झाला. श्री रत्नाप्पा कुंभारांना कोल्हापूर दरबारची शिष्यवृत्ती मिळाली.[४] पुढे या शिष्यवृत्तीने त्यांना फार मोलाची मदत केली, त्याचे थोडेसे ऋण फेडावे म्हणून छ.राजाराम महाराजांच्या ( १९२२-४० ) व्हिनस कॉर्नर येथे उभा केलेल्या पुतळ्याच्या कामी आण्णाचा सिंहाचा वाटा आहे.

सन १९३० साली रत्नाप्पा कुंभार इंटर परीक्षेला बसले असता दहशतवादी क्रांतिकारक भगतसिंग यांना ब्रिटिश सरकारने फाशी देण्याच्या कारणावरून झालेल्या आंदोलनात भाग घेतल्यामुळे आण्णा इंटरच्या परीक्षेत १९३० मध्ये नापास झाले.[५] आणि त्यांचे कॉलेजचे एक वर्ष वाया गेले. १९३१ मध्ये ते इंटर परीक्षा पास झाले पुढे लौकरच १९३३ साली राजाराम कॉलेज मध्ये बी.ए. ची पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले.[६] बलुतेदार वर्गातील गरीब कुंभाराचा पोर मुंबई विद्यापीठाची पदवी धारण करतो हा त्या काळातील खराखुरा चमत्कारच होता. सन १९३३ च्या पारतंत्र्याच्या काळात

ही पदवी घेणारी बहुजन समाजातील फारच थोडी मुले त्या काळी मुंबई राज्यात होती.

पदवी परीक्षे नंतर त्यांनी एल.एल.बी. चे पहिले वर्ष पूर्ण केले. त्यांनी वकिली करावी अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. त्यावेळी आपल्या देशात भारताच्या स्वातंत्र्यासाठी राजकीय चळवळीचा जोर वाढला होता, त्याचा परिणाम तरुण रत्नाप्पाच्या मनावर झाल्याने कॉलेजच्या जीवनामध्ये स्वातंत्र्य लढ्याकडे त्यांचा ओढा होता. पदवी परीक्षा पूर्ण होताच नोकरीच्या मागे न लागता या देशाच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये त्यांनी हिरीरीने भाग घेतला. या देशात इंग्रजांच्या अंमलाखालील भागात लढा करणे वेगळे पण संस्थानिकांच्या भागात ठराव करुन उठणे महाकठीण काम होते. आण्णाचा निश्चय दृढ होता. ते आपल्या ध्येयाला चिकटून होते. इंग्रजांच्या राज्यात मोठी नोकरी करणे व स्वत:चे जीवन सुखी करणे हे फार मोठे पणाचे लक्षण मानले जाई. पण या सर्व गोष्टींचा त्यांनी त्याग केला व देशकार्यास वाहून घेतले.

१९३४ मध्ये घरच्या वडिल मंडळींच्या आग्रहामुळे मालगांवच्या कुलकर्णी यांच्या घराण्यातील पार्वतीबाई यांच्याशी ते विवाहबध्द झाले. [७]
कै. पार्वतीवहिनी सारखी साध्वी, कर्तव्य परायण पत्नी आण्णाना लाभली हे आण्णाचे परमभाग्यच म्हटले पाहिजे. आयुष्यभर उत्तम साथ देण्याचे महत्कार्य या माऊलीने केले. तिच्या त्यागाला, सहनशिलतेला, समंजसपणाला तोड नाही. आण्णाचा जो अखिल भारतीय पातळीवर थोर कार्यकर्ता म्हणून गौरव झाला व अखिल महोत्सवही साजरा झाला त्यात कै. पार्वतीवहिनींचा सिंहाचा वाटा होता. कधीही कोणतीही तक्रार न करता सदैव प्रसन्न व हसतमुख राहून संसार प्रपंचाचा भार आनंदाने उचलण्याची दैवी देणगी त्यांना लाभली होती. रत्नाप्पाण्णा विवाहबध्द झाले खरे, पण चार भिंती आडचा सामान्य स्वार्थी संसार प्रपंच करण्यात गुंतून पडणारे त्यांचे व्यक्तीमत्व नव्हते. आण्णाचा संसार व घर पाहाण्यासारखा आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भाड्याच्या दोन खोल्यातील संसार आज अखेर पहावयास मिळतो. आण्णाना मंगला, रंजनी

आणि कल्पना ही तीन कन्यारत्ने झाली.[८] आज त्या विवाहित असून सुखी संसारी आहेत. आण्णाचे जावई डॉक्टर, इंजिनियर असे असून सुसंस्कृत तसेच सुविद्य आहेत.

इ. स. १९३६ च्या फैजपुरच्या कॉंग्रेसला एक राष्ट्रप्रेमी म्हणून आण्णा हजर राहिले.[९] तेथे त्यांच्या ध्येयवादी मनाने उचल घेतली. त्यानंतर त्यांच्या मनाचा ओढा देश सेवेकडे जोराने वाहू लागला. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या विचाराचा व आचाराचा फार मोठा प्रभाव पडला होता. आण्णानी अंगावर खादीचा पेहराव व गांधी टोपी चढवली ती आज अखेर तशीच आहे. त्यांच्या सेवावृत्तीला आपल्या ज्ञातीबांधवाकडून बोर्डिंगमध्ये त्यांना वाव मिळाला. काही दिवस वीरशैव लिंगायत बोर्डिंगचे सुपरिटेंडेंट म्हणून त्यांनी उत्तम काम केले.[१०]

याच सुमारास करवीरचे ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी भाई माधवराव बागल आणि आण्णा ह्यांची ओळख झाली. ह्या ओळखीचे पुढे स्नेहात रुपांतर झाले. आण्णा सुरुवातीस भाईजीचे चाहते होते पुढे प्रतिज्ञा पत्रकावर सही केल्यानंतर भाईजीचे सहकारी झाले त्या दोन स्वातंत्र्य सेनानींनी संपूर्ण करवीर संस्थान व पश्चिम महाराष्ट्रात लोक जागृती करुन ब्रिटिश राज्कर्त्यांना सळो की पळो करुन सोडले. स्वातंत्र्य चळवळ पुढे जोमाने रेटली.

याच काळात संस्थानिकांच्या जुलमी राजवटीमुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांची दुःखे निवारण्यासाठी कार्यकर्त्यांनी संस्थानिकांच्या विरुध्द खेडोपाडी जाऊन जन - जागृती करण्यासाठी सुरुवात झाली. सनदशीर मार्गाने दरबाराकडून नागरी स्वातंत्र्य मिळणार नाही म्हणून या काळातच शिरोळ पेट्यातील शेतकऱ्यांनी 'शेतसारा कमी करा', 'शेतसारा ब्रिटिश प्रांताएवढाच ठेवा' अशी मागणी सुरु केली. शिरोळच्या शेतकऱ्यांचा मोर्चा २५ डिसेंबर १९३८ रोजी दहा हजार लोकांसह कोल्हापूरात आला.[११]

१५ जानेवारी १९३९ ला मोर्च्यासाठी हजारो लोक कोल्हापूरात दाखल झाले.[१२] कोल्हापूर स्टेशनवर लोकांना पकडून मोटारीतून लांबवर सोडून देण्याचे सत्र कोल्हापूर दरबारने चालू केले. जमावावर घोडेस्वार घातले, त्यामुळे चार हजार शेतकऱ्यांनी चार,चारच्या रांगा करुन शहराच्या सडकेवर बैठक मारली. यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी मोर्च्याकडून मागण्यांचे निवेदन स्विकारले व वाटाघाटी केल्या व महाराजांनी वचन दिले की सारा खालसा प्रांता इतका करण्यात आला आहे. भाषण स्वातंत्र्यावरील निर्बन्ध काढून टाकण्यात आले आहेत. नागरिक स्वातंत्र्यावरील हक्क पंधरा दिवसात जाहिर होतील व राजबंदी सोडण्याबाबत पंधरा दिवसात विचार होईल तसेच जबाबदार राज्यपध्दती लवकरच मिळेल. भाषण व संघटना स्वातंत्र्यावरील निर्बन्ध रद्द झाल्याने भाई बागल व रत्नाप्पा कुंभार यांनी एक आठवडाभर ५० गावी जवळ जवळ ७०० मैलांचा दौरा करुन जनतेचे प्रबोधन करण्यास सुरुवात केली.[१३]

कोल्हापूर संस्थानात राजकीय जागृती करण्यासाठी प्रजापरिषदेची स्थापना ६-२-१९३९ रोजी करण्यात आली. भाई माधवराव बागल हे तिचे कार्याध्यक्ष होते. तर रत्नाप्पा कुंभार सरचिटणीस होते. परिषदेच्या सभेच्या अध्यक्षस्थानी भाई माधवराव बागल होते पण राजद्रोहाचे १२४(अ) कलमाखाली पकडण्याचे वॉरन्ट आल्याने बागलांना अटक झाली.[१४] पण ती सभा बरखास्त न करता मागे राहिलेल्या लोकांनी ती चालू ठेवली. सभेत प्रजापरिषदेचे अधिवेशन भरण्याचे ठरविले.

आण्णाना राजद्रोहाच्या आरोपाखाली वॉरन्ट निघाले. डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेटकडे ते स्वत: हजर झाले तेथे त्यांना अटक झाली. दि. २५-११-१९४० रोजी छत्रपती राजाराम महाराजांचे निधन झाले.[१५] त्यामुळे सर्व राजबंद्यांची एक महिन्यात सुटका झाली. त्यात रत्नाप्पा कुंभारही सुटले. यानंतर भाई माधवराव बागल व रत्नाप्पा कुंभार यांनी लोक जागृतीसाठी अनेक ठिकाणी प्रचार दौरे काढले. कोल्हापूर जिल्ह्यात आण्णांनी खादी वस्त्रोद्योग सुरु

करण्यासाठी प्रयत्न केला. याच काळात ( १९३९ ) जागतिक पातळीवर दुसऱ्या महायुध्दास सुरुवात झालेली होती. म.गांधींनी इंग्रज सरकारशी केलेल्या वाटाघाटी फिसकटल्याने इंग्रजांना १९४२ ला ' चले जाव ' असा इशारा दिला.[१६] त्यामुळे कॉंग्रेसच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांना अटक झाली या अटक सत्रानंतर भूमिगत चळवळीचे अखेरचे तेजस्वी पर्व सुरु झाले. ब्रिटिश शासनयंत्रणा कोलमडून टाकण्याचा भूमिगत चळवळीचा उद्देश्य होता.

८ ऑगस्ट १९४२ मुंबई येथील कॉंग्रेस कमिटीच्या बैठकीस प्रजापरिषादेचे कार्याध्यक्ष भाई माधवराव बागल व सरचिटणीस रत्नाप्पा कुंभार व इतर कार्यकर्ते हजर होते. ती अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीची बैठक क्रांतिकारक ठरली.[१७] तेथूनच या क्रांतिकारक चळवळीस सुरुवात झाली व याचे पडसाद तावडतोब संस्थानातून उठले. कोल्हापूर संस्थानातील भाई बागल,श्रेष्ठी वकिल,बगाडे इ. प्रमुख मंडळींना व इतर कार्यकर्त्यांना अटक झाली. या आंदोलनामध्ये रत्नाप्पा कुंभार, गोपाळ बकरे वगैरे कार्यकर्ते भूमिगत झाले. कोल्हापूरची चळवळ अखिल भारतीय लढ्याचा एक विभाग म्हणून आण्णांच्या नेतृत्वाखाली चालविण्यात आली. गावातील चावडया जाळून टाकणे, पोस्ट ऑफिस लुटणे, रेल्वे स्टेशन नष्ट करणे, टेलिफोन तारा तोडणे असे या चळवळीचे मुख्य कार्यक्रम होते. कोल्हापूर संस्थानातील भूमिगत चळवळ रत्नाप्पा आण्णांच्या नेतृत्वाखाली फार जोमाने कार्य करु लागली होती. आण्णांनी कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व भूमिगत कार्यकर्त्यांमध्ये एकसूत्रीपणा आणला व स्वत: ते दिवसभर भूमिगत कचेरीत टपाल लिहिण्याचे काम करत असत. हे भूमिगत कार्य जवळ जवळ पाच वर्षे त्यांनी केले. या पाच वर्षात हातकंणगले, रुकडी, जयसिंगपूर ही रेल्वे स्टेशने जाळण्याचा प्रयत्न केला. पन्हाळ गडावरील रेसिडेंट इंग्रज अधिकाऱ्याचे विश्राम-धाम जाळले. यासारखी अनेक कार्ये भूमिगत चळवळीत केली.

१९४२ च्या भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात रत्नाप्पा कुंभार हे भूमिगत होते या भूमिगत कारकिर्दीमध्ये रात्र-दिवस त्यांना कष्ट घ्यावे लागत. वेळेवर अन्न - पाणी मिळत नसे. मूठभर शेंगदाणे खाऊन व पोटभर पाणी

पिऊन त्यांना त्या काळी दिवस काढावे लागत असत.

रत्नाप्पा कुंभाराच्या राजकीय चळवळीबाबत कोल्हापूर दरबारने त्यांच्यावर वॉरन्ट काढून ते बेपत्ता असल्याने त्यांची निमशिरगाव येथील मालमत्ता पोलिसानी जप्त केली.

कोल्हापूर संस्थान प्रजापरिषदेचे सरचिटणीस रत्नाप्पा कुंभार यांना पकडून अथवा पकडण्यासाठी योग्य माहिती देणाऱ्या रु.१०,०००-चे बक्षिस देण्यात येईल अशा आशयाचा जाहिरनामा कोल्हापूर दरबारचे मुख्य प्रधान मे.पेरी यांनी प्रसिध्द केला होता.[१८]

भूमिगत चळवळीची धुरा खांद्यावर घेऊन देशभक्त रत्नाप्पाण्णा अहोरात्र काम करत असत. मा.रत्नाप्पांण्णा यांना ऐन आणीबाणीच्या काळात मोठा मानसिक धक्का बसला, त्यांचे स्फूर्तिदाते व प्रेरणास्थान असलेले प्रेमळ पिताजी इ.स.१९४३ मध्ये निवर्तले. आता वडिलांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी रत्नाप्पाण्णा येतील या आशेने पोलिसांनी वडिलांचा पार्थिव देह कडेकोट पहाऱ्यात ठेवला व अंत्यदर्शनासाठी आल्यावर रत्नाप्पाण्णाना आपण पकडू असे मांडे मनात खात बसले पण याही परिस्थितीत रत्नाप्पाण्णानी पोलिसांना चकवले, वेषांतर करुन ते केव्हा निघून गेले याचा पोलिसांना पत्ता देखिल लागला नाही. मा.रत्नाप्पाण्णा भूमिगत स्थितीत जेव्हा क्रांतिकारी चळवळ चालवत होते, तेव्हा पोलिसांनी त्यांची इतकी दहशत घेतली की त्यांचा पत्ता सापडावा म्हणून वेडयापिश्या झालेल्या पोलिसांनी अनेक निरपराध माणसांना बेदम अमानुष मारहाण केली.

या नंतर मुंबई सरकारच्या आदेशाने कोल्हापूर दरबारने सर्व राजबंद्यांची सुटका करण्याचे ठरवले. त्या प्रमाणे राजबंदी सुटल्यामुळे सर्वांना आनंद होणे स्वाभाविक होते. प्रजापरिषदेचे सरचिटणीस वीर रत्नाप्पा कुंभार व त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्याच्या हेतूने भाई माधवराव बागल यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. पण वीर रत्नाप्पा यांचा पत्ता न लागल्याने सत्कार

समितीने जमवलेला निधी जनतेस परत केला व पुढे दि.१-८-४७ ला रत्नाप्पा कुंभार आपला ५ वर्षांचा अज्ञातवास संपवून कोल्हापूरात प्रकट झाले.[१९] भूमिगत राहून परकियांशी व स्वकियांशी लढा देऊन प्रकट झालेले रत्नाप्पा कुंभार यांचे जनतेने अपूर्व स्वागत केले . त्यांना जनतेच्यावतीने एक लाखाचा निधी देण्यात आलापण तो त्यांनी स्वीकारला नाही.

प्रजापरिषदेने जबाबदार शासन पध्दतीचा पुरस्कार जोराने करुन आपल्या मागण्या छत्रपतींना मानण्यास भाग पाडले. या बाबतीत छत्रपती शहाजी महाराजांच्या बरोबर समझोता करण्यात आला. छ.शहाजी महाराजांसोबत झालेल्या समझोत्या नंतर महाराजांच्या वतीने व प्रजापरिषदेचे कार्याध्यक्ष या नात्याने माधवराव बागल यांना मंत्रीमंडळाची यादी सादर करण्याचे निमंत्रण आले. त्याप्रमाणे ११ नोव्हेंबर १९४७ रोजी प्रजापरिषदेच्या कार्यकारिणीने हंगामी मंत्रीमंडळात प्रजापरिषदेचे प्रतिनिधि म्हणून म.दु.श्रेष्ठ, रत्नाप्पा कुंभार, डी.एस. खांडेकर व मुख्यमंत्री म्हणून माधवराव बागल यांचा समावेश करण्यात आला.[२०] माधवराव बागल यांनी स्वत:कडे गृहखाते घेतले, म.दु.श्रेष्ठी यांचेकडे अर्थखाते दिले तर डी.एस.खांडेकर यांचेकडे महसूल खाते सोपविण्यात आले. रत्नाप्पा कुंभर यांच्याकडे पुरवठा खाते देण्यात आले. खाते वाटणी बाबत रत्नाप्पा कुंभार व माधवराव बागल यांचेत तीव्र मतभेद झाले. रत्नाप्पा कुंभार व म.दु.श्रेष्ठी यांनी मंत्रीपदाचे राजीनामे दिले. या दोघांसहित आठ सभासदांनी १७ नोव्हेंबर १९४७ रोजी राजीनामे दिले.[२१] व पुढे बागल मंत्रीमंडळही फार काळ टिकले नाही.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाल्यानंतर आण्णांच्या कार्याची दिशा बदलली. स्वातंत्र्याकरिता यापूर्वी लढलेले देशभक्त रत्नाप्पा कुंभार यांच्या सारखे वीर नवभारतात नवसमाज घडविण्याच्या कार्यात गुंतले, स्वातंत्र्यानंतर या देशापुढे प्रथम प्रश्न होता की,भारत एकसंघ बनवायचा,इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य दिले खरे परंतु या देशातील संस्थानांचे, राज घराण्याचे हक्क तसेच

अबाधित राहल्यामुळे देशाच्या राज्य कारभारात व व्यवहारात अनेक अडचणी निर्माण झाल्या, त्यामुळे त्या काळचे केन्द्रीय गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थाने विलीनीकरणाच्या बाबतीत कठोर भूमिका स्वीकारली. वर्षभरात भारतातील सारी संस्थाने विलीन करण्याचा भारतीय संघराज्य बनविण्याचा कार्यक्रम त्यांनी हाती घेतला. महाराष्ट्रात संस्थाने विलीनीकरणावर खुपच खळबळ निर्माण झाली. प्रत्येक संस्थानातील राजे व उमराव सामान्य प्रजेला भडकवीत होते. संस्थानी विलीनीकरणाची चळवळ मोडून काढण्याचा प्रयत्न करीत होते. या काळात दक्षिण महाराष्ट्रात १८ संस्थाने होती.[२२] महाराष्ट्रातील संस्थाने विलीनीकरणाची जबाबदारी पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी रत्नाप्पाण्णा कुंभारांवर टाकली. प्रसंगी जीव धोक्यात घालूनही संस्थाने विलीनीकरणाचा प्रश्न रत्नाप्पा आण्णानी सोडवला . कारण जितके महत्व स्वातंत्र्य लढयाला होते तितकेच संस्थाने विलीनीकरणाच्या आंदोलनाला होते. देशाला पारतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी परकीयां बरोबर झगडा द्यावा लागला. परंतु संस्थाने विलीनीकरणाच्या आंदोलनात स्वकीयांशी लढा द्यावा लागत होता. त्यामुळे जनतेला आपलेसे करुन घेऊन राजेशाही विरुध्द हा लढा लढवावा लागत होता.

महात्मा गांधींचा खून ३० जानेवारी १९४८ रोजी दिल्लीत झाला.[२३] आणि कोल्हापूर जिल्ह्यात जी दंगल जाळपोळ झाली.ती थांबविण्यात बागल मंत्रीमंडळ असमर्थ ठरले. अशा प्रकारचा आरोप बागल मंत्रीमंडळावर करण्यात आला. त्यामुळे हे मंत्रीमंडळ जबाबदार असून ते बरखास्त करावे अशा प्रकारची मागणी रत्नाप्पा कुंभार गटाच्या प्रजापरिषदेने केली. या नंतर संस्थान विलीनीकरणाच्या चळवळीला जोर चढला. बागल मंत्रीमंडळ केन्द्र सरकारने बडतर्फ केले आणि नंजाप्पा यांची प्रशासक म्हणून नेमणूक झाली. दंगल व जाळपोळ झाली या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी कोयाजी कमिशन नेमले.

करवीर संस्थान भारतात विलीन करण्याबाबत दोन गट पडले. रत्नाप्पा कुंभार हे विलीनीकरणाच्या बाजूकडून होते, त्यासाठी त्यावेळचे संस्थानी मंत्री

सरदार वल्लभभाई पटेल यांना रत्नाप्पा कुंभारांनी पत्रे पाठवून तत्कालीन परिस्थितीची जाणिव करुन दिली. विलीनीकरण चळवळीच्या वेळी रत्नाप्पा कुंभारांना ठार मारण्याचे अनेक कट झाले होते. त्यातून ते वाचले. संस्थानी प्रजेच्या ताकदीच्या जोरावर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पाठींब्याने सर्व दक्षिणी संस्थाने भारतीय संघ राज्यात विलीन करण्याचे अप्रतिम, राष्ट्रीय कार्य रत्नाप्पा कुंभार यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. अशा तऱ्हेने दि. १ मार्च १९४९ ला केन्द्र सरकारने करवीर संस्थान विलीन करुन मुंबई प्रांतात जोडले.[२४]

रत्नाप्पा कुंभार यांचे नेतृत्व प्रांतिय स्वरुपाचे होते याचा उपयोग केन्द्रासाठी करण्याचा सरदार वल्लभभाई पटेलांनी ठरवल्याने कोल्हापूर जिल्ह्याचे प्रतिनिधि म्हणून रत्नाप्पा कुंभार यांना लोकसभेवर खासदार म्हणून नेमले.[२५]

पार्लमेन्टमध्ये असताना आण्णांनी फॅनारेन अफेअर्स स्टॅंडींग कमिटीच्या कामकाजात फार महत्वाची कामगिरी केली.[२६] १९५० साली स्वतंत्र भारताची राज्यघटना अस्तित्वात आली. घटनेच्या पहिल्या प्रतिवर पंडित नेहरु, सरदार पटेल, यांचे बरोबर स्वाक्षरी करण्याचा मान रत्नाप्पा कुंभारांना मिळाला.[२७]

पार्लमेन्टमध्ये व घटनासमितीमध्ये आण्णा संस्थानी जनतेच्या भावना काय आहेत याचे विवेचन करुन कॉंग्रेस श्रेष्ठींच्या निर्देशनास आणीत होते.

१९५० साली जिल्हा कॉंग्रेस कमिटीची स्थापना झाली. या कमिटीचे रत्नाप्पाण्णा अध्यक्ष होते. अध्यक्ष या नात्याने त्यांनी कोल्हापूर जिल्ह्याच्या विकासाच्या योजना तयार केल्या.[२८] जिल्ह्यामध्ये तालुकावार कॉंग्रेस कमिट्या स्थापन करुन कोल्हापूर जिल्हा कॉंग्रेसमय करुन टाकला.

दिनांक १७ फेब्रुवारी १९५१ ला आण्णांनी कोल्हापूरात ' कौन्सिल ऑफ एज्युकेशन ' या शैक्षणिक संस्थेची स्थापना केली व संस्थान काळातील जुन्या लॉ कॉलेज ची व्यवस्था नव्याने स्थापन झालेल्या संस्थेने घेतली.[२९]

१९५२ ला स्वतंत्र भारतात पहिली पंचवार्षिक योजना स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सुरु केली. या पंचवार्षिक योजनेत ६० जिल्ह्याची विकास केन्द्रे म्हणून निवड केली. या ६० जिल्ह्यामध्ये कोल्हापूरची निवड आण्णाच्या प्रयत्नामुळे झाली.[30] या वेळी कोल्हापूर जिल्ह्याचे विकासाधिकारी म्हणून शंकरराव माने हे काम करीत होते, कोल्हापूर जिल्ह्याला अशा विकास योजना मिळाल्या नंतर या संपूर्ण जिल्ह्यात श्रमशक्तीला प्रचंड वेग मिळाला. या योजनेमुळे लोकांनी खेडोपाडी रस्ते बांधले, इमारती उभारल्या, समाज मंदिरे उभारली या सर्व कार्यामागे आण्णाचे मार्गदर्शन होते.

कॉंग्रेस सरकारने जिल्ह्यावार विकास मंडळे स्थापन केली. १९५७ ते १९६० अखेर आण्णा जिल्हा विकास मंडळाच्या प्रमुखपदी राहून कार्य करीत होते. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीय महामार्ग, राज्यरस्ते, जिल्हा रस्ते, जोड रस्ते, गावठाणातील रस्ते इ. रस्ते बांधणीची कामे पूर्ण झाली. पण शेतकऱ्यांचा माल या रस्त्यावर येण्यापूर्वी 'पाणंद ' रस्त्यावर अडकून पडतो याची सर्वात आधी जाणिव आण्णाना झाली म्हणून त्यांनी शासनाचे, कार्यकर्त्यांचे लक्ष पाणंद रस्त्याकडे वेधले. आण्णा १५-१-७३ रोजी नृसिंहवाडीच्या सभेत म्हणतात 'खेड्यातील पाणंद रस्ते म्हणजे खऱ्या अर्थाने भारताच्या उज्ज्वल भाग्य रेषाच आहेत.[३१]

भारताची खरी समृध्दी कृषीप्रधान उद्योग धंद्यात सामावली आहे. या दृष्टीने विचार करुन आण्णानी सहकारी पध्दतीचा सुवर्णमध्य करुन कृषी उद्योग प्रधान व्यवसायाची कास धरली आणि १ ऑक्टोबर १९५५ ला श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याची स्थापना केली.

१९५६ साली संयुक्त महाराष्ट्राच्या प्रखर चळवळीमुळे महाराष्ट्रातील कॉंग्रेस धोक्यात आली. कै.ना.यशवंतराव चव्हाण यांना रत्नाप्पा कुंभारांनी कॉंग्रेसवरील निष्ठेमुळे धोक्याच्या वेळी साथ दिली.कै.ना.यशवंतराव चव्हाण कृतज्ञतापूर्वक मान्य करीत असत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या झंझावती वातावरणात १९५७ साली विधान सभेच्या निवडणुका झाल्या.

शिराळ तालुका मतदार संघातील विधान सभेची जागा संयुक्त महाराष्ट्र समितीच्या उमेदवाराला मिळाली. समितीचे उमेदवार आप्पासाहेब पाटील यांनी कॉंग्रेसचे उमेदवार रत्नाप्पा कुंभार यांचा १३७९ मतांनी पराभव केला. रत्नाप्पा कुंभारांना २२,५७४ मते पडली तर पाटील यांना २३,९५३ मते पडली.[३२]

वरील आकडेवारी पाहाता असे दिसून येते की रत्नाप्पा कुंभार शिराळ तालुकाच धरून राहिले असते तर ते प्रचंड बहुमताने निवडून आले असते. त्यावेळी कै.ना.यशवंतराव चव्हाण मंत्रीमंडळात त्यांना मानाचे स्थान मिळाले असते पण आपला मतदार संघ सोडून ते इतर कॉंग्रेस उमेदवारांच्या प्रचारासाठी फिरत राहिल्याने त्याचा फायदा त्यांच्या प्रतिस्पर्ध्यांनी घेतला त्यामुळे ते पराभूत झाले.अपयशाने ते कधीच खचले नाहीत तर नव्या जोमाने कामाला लागले.कारण राजकारण हे एकच क्षेत्र नसून समाज कार्य, शैक्षणिक कार्य, त्यांची जवळची कार्यक्षेत्र आहेत.

१९५७ साली या परिसरातील वाणिज्य शिक्षणाची गरज ओळखून कौन्सिल ऑफ एज्युकेशन कॉमर्स कॉलेज सुरु करण्याचा निर्णय श्री रत्नाप्पा कुंभारांनी घेतला. आज त्याने उत्तम नावलौकिक संपादन केला आहे.[३३]

१९६० मध्ये त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कै.यशवंतराव चव्हाण रत्नाप्पा कुंभारांच्या कार्यावर प्रभावित होऊन त्यांच्या `कौन्सिल ऑफ एज्युकेशन` या संस्थेला तोफखान्याची जागा कायमची दिली हा शासनाने केलेला गौरवच होय.

पुढे महाराष्ट्र विधान सभेच्या १९६२ च्या निवडणूकीत रत्नाप्पा कुंभारांना हे शिराळ तालुक्यातून ४०,९८६ मते मिळाली. प्रतिस्पर्धी सातगोंडा रेवगोंडा पाटील ( स्वतंत्र ) यांना १६,३३५ मते मिळाली आण्णा ही निवडणूक विजयी झाले.[३४]

विकास कार्याची धुरा वाहताना प्रत्येक कार्यात शेतकऱ्यांचा विचार न करता आपल्या कार्यास बळकटी आणण्यासाठी साखर धंद्यातील कामगाराची तांत्रिक

दृष्टी व यांत्रिकदृष्टी अभ्यासू बनावी म्हणून डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्ट संस्थेचे अध्यक्ष असताना त्यांनी अनेक शिबिरे भरवली. बौध्दिक विकासाबरोबर आर्थिक विकासाचा पाया घातला. तसेच परदेशाचा प्रवासही केला.[३५]

ग्राहक चळवळीच्या द्वारे सहकारी तत्वावर २४ जानेवारी १९६३ मध्ये कोल्हापूर सेंट्रल को.ऑप.कंझ्युमर्स ची स्थापना केली. याच संस्थेमार्फत कोल्हापूर जिल्ह्यात अनेक ठिकाणी ' जनता बाझार ' ची सुरुवात केली. त्या पाठोपाठ २५ जानेवारी १९६३ ला इचलकरंजी सेंट्रल को.ऑप.कंझ्युमर्स स्टोअर्स ची स्थापना केली.[३६]

त्यांच्या विधायक कार्याला उजाळा देणारी दुसरी एक संस्था म्हणजे ' कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सुत गिरणी ' होय. या संस्थेची स्थापना ६ डिसेंबर १९६३ रोजी झाली.[३७] शेतकरी विणकऱ्यां बरोबरच शहराकडे धाव घेण्याच्या कामगारांची संख्या कमी व्हावी हाच या संस्था स्थापने मागचा हेतू होता.

पुढे १९६७ च्या महाराष्ट्र विधान सभा निवडणूकामध्ये रत्नाप्पा कुंभार १३५० मतानी पुन: निवडून आले.[३८]

त्यांच्या कार्याचा गौरव अनेक संस्थानी केलेला आहे. तासगांव कुंभार समाज, जिल्हा सांगली यांचेकडून मानपत्र दिले गेले. त्याचप्रमाणे स्वातंत्र सैनिक मानपत्रही मिळाले. कोल्हापूर महानगरपालिकेनेही त्यांच्या सन्मानार्थ मानपत्र अर्पण केले आहे. अशा प्रकारे त्यांच्या कार्याची दखल अनेकांनी घेतलेली दिसते.

पुढे १९७२ च्या महाराष्ट्र विधान सभेच्या निवडणूका झाल्या, त्यामध्ये शिरोळ मतदार संघातून रत्नाप्पा कुंभार यांना ११,३३० मते मिळाली त्याचे प्रतिस्पर्धी शंकरराव शिवलींग कोरे यांना १९२४ मते मिळाली.[३९]

विधान सभासपतीपदी रत्नाप्पा कुंभार यांची कायमच्या सभापतीची निवडणूक होईपर्यन्त निवड करण्यात आली.[४०] तसेच नोव्हेंबर १९७४ ते फेब्रुवारी १९७५ पर्यन्त महाराष्ट्र राज्याचे गृहमंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले. त्या नंतर

फेब्रुवारी १९७५ ते मे १९७७ पर्यन्त अन्न व नागरी पुरवठा मंत्री म्हणून त्यानी काम पाहिले त्यानंतर मे १९७७ ते मार्च १९७८ पर्यन्त त्यानी नगरविकास मंत्री म्हणून काम पाहिले.[४१]

शेती मालाला योग्य भाव मिळाले पाहिजेत यासाठी त्यांनी नवीन योजना उभारण्यास सुरुवात केली. काळम्मावाडी धरणाच्या मागणीसाठी आपल्या पक्षाच्या राज्यकर्त्यां बरोबर टक्कर देऊन ही मागणी मान्य करुन घेतली. २३ मार्च १९७६ मध्ये दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते काळम्मावाडी धरण प्रकल्पाचा भूमिपूजन समारंभ पार पाडला. ठिकठिकाणी पाणी पुरवठा, 'लिफ्ट इरिगेशन योजना' कार्यान्वित करुन कोरडवाहू जमिनीची तहान शमवली.

पुढे महाराष्ट्र विधान सभेच्या १९७८ च्या सार्वत्रिक निवडणूकीत शिरोळ मतदार संघातून रत्नाप्पा कुंभार यांना ४४,३०५ मते पडली तर शे.का.पक्षाचे उमेदवार दिनकरराव यादव यांना ३१,७५६ मते पडली व अशा प्रकारे रत्नाप्पा कुंभार चौथ्यांदा निवडणूकीत यशस्वी झाले.[४२]

महाराष्ट्र विधान सभेच्या १९८० च्या मध्यावधी निवडणूकीमध्ये शिरोळ मतदार संघात अतितटीची लढत झाली. यावेळी रत्नाप्पा कुंभार दिनकरराव यादव यांचेकडून अनेपेक्षीतरित्या पराभूत झाले.[४३]

२६ जानेवारी १९८५ मध्ये रत्नाप्पा कुंभार यांना सहकारा द्वारे जे समाज परिवर्तन घडवून आणले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल भारत सरकारकडून त्यांना 'पद्मश्री' हा सन्मानीय किताब मिळाला.[४४] आशाप्रकारे भारताच्या ३५ व्या प्रजासत्ताक या मंगलदिनी रत्नाप्पा कुंभार यांना भारत सरकारने 'पद्मश्री' चा बहुमोल किताब बहाल करुन त्यांच्या सर्वांगीण कार्याचा मोठा गौरव केला आहे. अशाप्रकारे त्याच्या अनमोल कार्याची खऱ्या अर्थाने पोच पावतीच दिली आहे.

२८ मार्च १९८७ रोजी पुणे विद्यापीठाच्या ७६ व्या वार्षिक पदवीदान समारंभात ज्येष्ठ नेते रत्नाप्पा कुंभार यांना कुलगुरु डॉ. वि.ग. भिडे यांनी सन्माननीय डी. लिट्.पदवी दिली.[४५] महामहीयांच्या वैयक्तिक समितीचे अध्यक्ष डॉ.सी.एन.आर.राव पदवीदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

१९९० च्या महाराष्ट्र विधान सभेच्या निवडणुकीत शिरोळ मतदार संघात आय कॉंग्रेस उमेदवार रत्नाप्पा कुंभार यांना ७१,०८१ मते पडली. त्याचे प्रतिस्पर्धी डॉ.एस.के. पाटील ( स्वतंत्र ) यांना ५१,४१५ मते मिळाली.आशा प्रकारे १९,६६६ मताधिक्याने रत्नाप्पा कुंभार विजयी झाले.[४६]

श्री रत्नाप्पा आण्णाचे जीवन चरित्र वैभवशाली आहे. आज वयाच्या ८३ व्या वर्षी ते जोमाने पंचगंगा साखर कारखान्यांच्या अध्यक्षपदाची जबाबदारी यशस्वी सांभाळीत आहेत. तसेच महाराष्ट्राच्या विधान सभेच्या कामकाजात भाग घेतात. अनेक सामाजिक,शैक्षणिक संस्थाना भरघोस आर्थिक मदत देत आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक गांवी मंदिरे ,आखाडे त्यांच्या मदतीने उभारली आहेत. अनेक युवकांना मार्गदर्शन करत आहेत. राजकारण,समाजकारण,शिक्षण, सहकार ही आण्णाची आवडती कार्यक्षेत्रे आहेत. त्यात ते अहोरात्र मग्न असतात. वाचन, मनन चालू असते तर अनेक सार्वजनिक समारंभात हिरीरीने भाग घेतात. त्याचे जीवन कार्य हे इतरांना आदर्श व प्रेरणादायी ठरले आहे.

## संदर्भ


१ पाक्षिक रुद्रवाणी - १५ सप्टेंबर १९७९, पृ.क्र.१५.

२ अमृतमहोत्सव गौरव ग्रंथ - १५ सप्टेंबर १९८४, पृ.क्र.९.

३ ग.रं.भिडे । पु.ल.देशपांडे कोल्हापूर दर्शन, पृ.क्र.४६७.

४ डॉ.रत्नाप्पा कुंभार वाढदिन - विशेषांक १९९०,पृ.क्र.५.

५ पाक्षिक - रुद्रवाणी - १४-१५ - डिसेंबर, १९७९, पृ.क्र.१५

६ रत्नदर्पण गौरव ग्रंथ - १९७१ - पृ.क्र.३३

७ किल्ला पृ.क्र.९८

८ दै.सागर दे.भ.रत्नाप्पा कुंभार गौरव पुरवणी - पृ.क्र.१२

९ अखंड भारत - ८ नोव्हेंबर १९४५ - पृ.क्र.४

१० किल्ला -,,-- पृ.क्र.४

११ करवीर क्रांती स्वातंत्र्य सैनिक गौरव ग्रंथ - पृ.क्र.११

१२ दै.केसरी - १७ जानेवारी १९३९ - पृ.क्र.२०

१३ करवीर क्रांती - १९७२ - पृ.क्र.१२

१४ माधवराव बागल - जीवन प्रवाह - पृ.क्र.३८

१५ स.मा.गर्गे - करवीर रियासत - पृ.क्र.६४३

१६ य.दी.फडके - आण्णासाहेब लठ्ठे - पृ.क्र.२१४

१७ अमृत महोत्सव गौरव ग्रंथ - १५ सप्टेंबर १९८४ - पृ.क्र.२६

१८ ग.रं. भिडे - कोल्हापूर दर्शन - पृ.क्र. ४६७
पु.ल.देशपांडे

१९ सत्यवादी कोल्हापूर शनिवार ता.९-८-१९४७ - पृ.क्र. ३

२० माधवराव बागल - जीवन प्रवाह - पृ.क्र. १३१

२१ दुर्गादास - सरदार पटेल कॉरेस्पॉंडन्स ,खंड -५,पृ. ४५६-४५८

२२ वि.अ.पटवर्धन - दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांच्या विलिनीकरणाची कथा - पृ.क्र.९२

२३ य.दि.फडके - आण्णासाहेब लठ्ठे - पृ.क्र. ३६०

२४ स.मा.गर्गे - करवीर रियासत - पृ.क्र. ६४७

२५ सत्यवादी १० फेब्रुवारी १९७८ - पृ.क्र. २

२६ सत्यवादी २७-२-५७ - पृ.क्र. २

२७ दि कौन्सिल ऑफ एज्युकेशन शहाजी लॉ कॉलेज,जस्टीस - कोल्हापूर - १९८६-८७

२८ किल्ला -

२९ अमृतमहोत्सव गौरव ग्रंथ - १५ सप्टेंबर १९८४, पृ.क्र. ३१

३० दि कौन्सिल ऑफ एज्युकेशन शहाजी लॉ कॉलेज,कोल्हापूर - जस्टीज - १९८६-८७

३१ अमृत महोत्सव गौरव ग्रंथ - १५ सप्टेंबर १९८४, पृ.क्र. ३१

३२ सत्यवादी १८ मार्च १९५७,पृ.क्र.१

३३ रत्नकुंभ - कौन्सिल ऑफ एज्युकेशन - कोल्हापूर १९८५, पृ.क्र.७

३४ पुढारी - २८ फेब्रुवारी १९६२

३५ मुलाखत - श्री रत्नाप्पा कुंभार गौरव ग्रंथ

३६ अमृत महोत्सव गौरव ग्रंथ - १५ सप्टेंबर,१९८४

३७ अमृत महोत्सव गौरव ग्रंथ - १५ सप्टेंबर,१९८४ , पृ.क्र. ३१

३८ पुढारी २३ फेब्रुवारी १९६७

३९ पुढारी १२ मार्च १९७२,पृ.क्र.१

४० किस्सा

४१ इंटरनॅशनल सेमिनार ,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर - १९८७, पृ.क्र. ६१

४२ पुढारी २८ फेब्रुवारी १९७८

४३ पुढारी ३ जून १९८०, पृ.क्र.१

४४ दि कौन्सिल ऑफ एज्युकेशन - शहाजी लॉ कॉलेज,कोल्हापूर १९८६-८७

४५ केसरी - २९ मार्च, १९८७

४६ दै.पुढारी २ मार्च १९९०, पृ.क्र.३.